**Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur**

# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

डॉ. खत्री महाविद्यालयात बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न.

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक २३ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. एन. एच. खत्री सर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. संजय गोरे, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, सोबतच संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, संस्थेच्या कोषाध्यक्ष प्रा. अनुश्री पाराशर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे आणि विज्ञान शाखाप्रमुख प्रा. आर. के. राजुरकर इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे वर्षभरात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या दृष्टिकोनातून आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि कौशल्यावर आधारित विविध उपक्रम महाविद्यालयात आयोजित करून विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाने आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात येते. याच उद्देशाने 23 मार्च ला भव्य बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. साधारणत: १५० विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यामध्ये वर्ग ११ वी पासून पदव्युत्तर, पीएच. डी. संशोधक आणि शिक्षकापर्यंतचा समावेश होता. सोबतच महाविद्यालयाच्या “स्पंदन” वार्षिकांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय डॉ. एन. एच. खत्री सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. संजय गोरे यांनी भव्य बक्षीस वितरण सोहळयाबद्दल महाविद्यालयाची प्रशंसा केली ते म्हणाले की, या महाविद्यालयाने फार अल्प कालावधीत लौकिकता मिळवली. विद्यापीठाने महाविद्यालयाच्या प्रगतीचा विचार करून या महाविद्यालयास म्हणूनच उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देऊन सन्मानित केले. ही आपल्यासाठी आनंदाची आणि भाग्याची गोष्ट आहे. एवढ्या मोठ्या भव्य प्रमाणात बक्षीस वितरण सोहळा पाहून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकामध्ये प्राचार्यांनी कार्यक्रमांचा उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा शिस्तबद्ध व एकसमान व्यक्तिमत्व घडविण्यासाठी या सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन आणि संपूर्ण रूपरेषा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष कावरे यांनी स्पष्ट केली, तर मान्यवरांचे आभार डॉ. दिलीप बावणे यांनी मानले. या भव्य बक्षीस वितरण सोहळ्याला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विजेता विद्यार्थ्यांसहित इतरही विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शिक्षकांचे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थितीसह सहकार्य लाभले.







डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
बक्षीस वितरण




डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
बक्षीस वितरण